# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## कृषि सहायक (पदवीधर)/पदविका लेखी परिक्षेकरिता

## महत्वाच्या सुचना

१. विद्यापीठाने कृषि सहायक पदावर नियुक्ती करण्याकरीता विहीत केलेल्या लेखी परिक्षेमध्ये उमेदवाराने मिळविलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार गुणानुक्रमे उमेदवारांची अंतिम निवड करण्यांत येईल. गुणवत्ता यादी त्याच दिवशी किंवा लगतच्या दिवशी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल. (अपिहार्य कारणामुळे वेळेत थोडा बदल होवू शकतो)

२. शासन निर्णय क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७ जुन, २००८ अन्वये गुणवत्ता यादीतअंतर्भाव होण्यासाठी उमेदवारास लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील.

३. लेखी परिक्षेच्या निकालाच्या आधारे उमेदवारांना जाहिरात झालेल्या पदांची संख्या विवारात घेवून योग्य प्रमाणात मुळ कागदपत्राची तपासणी करण्याकरिता बोलविण्यात येईल. उमेदवारास एमकेसीएल यांनी पुरविलेला पीडीएफ अर्जाची प्रत सोबत आणून त्यासोबत जाहीरातीचे अनुषंगाने त्यावेळेस सादर केलेले सर्व प्रमाणपत्राच्या मुळ प्रती तपासण्याकरीता सोबत आणाव्यात व मागीतल्यानंतर तपासणीकरीता उपलब्ध करून द्याव्यात.

४. उमेदवाराने सदर प्रवेश पत्रावर स्वतःचा अलिकडील काळातील फोटो लावुन स्वतःची स्वाक्षरी करावी. प्रवेश पत्रावर केलेली स्वाक्षरी, उत्तर पत्रिकेवरील स्वाक्षरी, परिक्षेवेळी उपस्थित पत्राकावर केलेली स्वाक्षरी आणि अर्जावर केलेली स्वाक्षरी एकच असलेबाबतची खातरजमा केली जाईल. त्यात तफावत आढळुन आल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

५. उमेदवारांनी लेखी परिक्षेकरिता येतांना सोबत कुठलेही एक ओळखपत्र, जसे की आधार कार्ड, वाहन चालवण्याचा परवाना, मतदान कार्ड, पॅन कार्ड सोबत आणावे.

६. सदर प्रवेश पत्र उमेदवाराने परिक्षेच्या दरम्यान सोबत बाळगावे व संबंधित अधिका-याने विचारणा केल्यास उपलब्ध करून द्यावे.

७. परिक्षार्थीने परिक्षा स्थळी किमान अर्धा तास अगोदर उपस्थिती राहुन आसन व्यवस्थेची माहिती करून घ्यावी.परिक्षा सुरू झाल्यानंतर आलेल्या उमेदवारांना १५ मिनीटांनंतर परिक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही तसेच परिक्षा सुरू झाल्यापासून परिक्षा संपेपर्यंत कोणलाही परिक्षा हॉल मधून बाहेर जाता येणार नाही.

८. परिक्षार्थीने लेखी परिक्षे दरम्यान कुठल्याही प्रकारच्या गैरमार्गाचा अवलंब अथवा राजकीय सामाजिक अथवा वरिष्ठ शासकीय/निमशासकीय अधिकारी यांचे कडुन कुठल्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याचे आढळल्यास संबंधित परिक्षार्थीस परिक्षेकरीता/निवड करावयाचे पदाकरीता अपात्र ठरविण्यांत येईल.

९. उपरोक्त लेखी परिक्षेला उपस्थित राहण्यास विद्यापीठाव्दारे आपणांस कोणत्याही प्रकरचा प्रवास भत्ता, दैनंदिन भत्ता वा येण्या जाण्याचे भाडे दिले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१०. विद्यापीठ कुठल्याही प्रकारच्या टपाल विलंबास किंवा टपाल खात्याव्दारे चुकीच्या वाटपास वा इतर कुठल्याही प्रकारच्या विलंबास जबाबदार राहणार नाही.

११. संबंधित उमेदवार विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या संदर्भाधिन जाहीरातीमधील आवश्यक अटी व शर्ती अथवा शैक्षणिक अर्हता/धारण करीत नसल्यास त्याने उक्त प्रवेश पत्र दुर्लक्षित करावे व अशा उमेदवाराने सदर परिक्षेला उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही.

१२. उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी लागणारे सर्व साहित्य उदा. बॉलपेन, पेन्सील, रबर इ. स्वतः सोबत आणावे.

१३. परिक्षेची वेळ संपल्यानंतर उमेदवाराने प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका संबंधीत पर्यवेक्षकाकडे परत करणे आवश्यक आहे. यापैकी कोणतेही साहित्य परिक्षा कक्षाच्य बाहेर नेल्यास / नेल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत उमेदवारांविरूद्ध फौजदारी दंड संहितेनुसार (आय.पी.सी.) तसेच परिक्षा गैरप्रकार अधिनियम अन्वये कार्यवाही करण्यात येईल. याची कृपया संबंधीत उमेदवाराने नोंद घ्यावी.

१४. उत्तर पत्रिकांची तपासणी ओ.एम.आर. या संगणकीय पद्धतीने होणार असल्यामुळे कृपया उत्तरपत्रिकेची घडी करू नये किंवा चुरगाळू नये तसेच उत्तरपत्रिका खराब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

१५. उत्तर पत्रिकेमध्ये उत्तर नमुद करताना पुर्ण विचारांती उत्तर नमुद करावे. खाडाखोड केलेले एकापेक्षा अधिक पर्याय अर्धवट वर्तुळात भरलेले असे कोणतेही उत्तर ग्राह्य धरण्यात येणार नाही व त्यासाठी गुण दिले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१६. उत्तर पत्रिकेची तपासणी ओ.एम.आर. या संगणकीय पद्धतीने केली जाणार असल्याने त्यात मानवी हस्तक्षेप / फेरबदलास अजिबात वाव नाही त्यामुळे उमेदवाराची कोणत्याही प्रकारची गुणपडताळणी अथवा फेर तपासणीची विनंती मान्य केली जाणार नाही.

१७. परिक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वतःजवळ भ्रमणध्वनी (मोबाईल) अन्य संपर्क येत्र, गणकयंत्र इत्यादी कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक साधने बाळगणे, तसेच कोणत्याही प्रकारचे लिखीत छापील साहित्य स्वतःजवळ बाळगणे, त्याचा वापर करणे, इतर उमेदवाराशी संपर्क साधणे किंवा कोणत्याही गैरप्रकारांचा अवलंब केल्याचे कोणत्याही क्षणी आढळून आल्यास उमेदवारास लेखी परिक्षेकरीता व या पदाकरीता अपात्र ठरविण्यात येईल.

१८. ओ.एम.आर. संगणकीय पद्धतीच्या उत्तरपत्रिकेमध्ये प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी चार वर्तुळे दिलेले असतील, त्या वर्तुळामध्ये बरोबर असणा-या उत्तराचा पर्याय गडद काळ्या बॉलपेन शाईने ठळकपणे भरावयाचा आहे.

१९. कुठल्याही पुर्व सुचने शिवाय परिक्षे संबंधी अनुषंगिक व्यवस्था प्रक्रिया खंडीत किंवा रद्द करणे अथवा त्यात बदल करणे याबाबतीत सर्व अधिकार कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी राखुन ठेवले आहे.

**कुलसचिव,**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

# DR.PANJABRAO DESHMUKH KRISHI VIDYAPEETH, AKOLA.

## IMPORTANT CONDITIONS FOR THE WRITTEN EXAM OF AGRICULTURE ASSISTANT TO BE HELD ON 25$^{TH}$ JANUARY 2015.

1. The selection of candidates will be made on the basis of the marks obtained in the Written Examination as per merit. The marks so obtained by the candidates will be displayed on the University Website on the same day or next day.

2. As per government Resolution Dated 27 June, 2008 the candidates must possess 45% marks in written test for inclusion in the merit list.

3. The candidate is required to darken with the black boll pen the circle of his choice of correct answer from the multiple choices given in OMR answer sheet.

4. The standard answer sheet will be displayed on the University Website after written exam is over.

5. On the basis of result of written exam, the candidates in appropriate number (Category wise), will be called for document verification and instructions regarding thereto will be displayed on University Website only. No separate communication will be made in this regard. The concerned candidate will require to bring, at the time of document verification, his copy of PDF form issued by MKCL and the original document mentioned in the application form and a set of Xerox copies of the relevant document. The document issued after the last date of submission of application will not be considered.

6. The candidate should bring a latest Photo/Aadhar Card, Voter ID, PAN Card, Driving License, etc.

7. The candidate will have to remain present at the examination centre half an hour before commencement of Exam. The candidate will not be permitted to enter in examination hall after 15 minutes from the commencement of Exam and also will not be allowed to live exam hall before scheduled time of exam.

8. The candidate should not bring with him calculator, Mobile phone, I pad or any sort of electronic gazettes in exam hall.

9. Incase the candidate does not possess the requisite qualification/terms as prescribed by the University in its advertisements, the said call letter should be treated as cancelled and he need not to attend the Written Test.

10. Incase it is found that the candidate has submitted false information about his/her qualification, date of birth etc. his/her candidature will be canceled at any stage without assigning any reason.

11. The Dr. P.D.K.V., Akola reserved all right to cancel or change the Whole/partially the procedure of above Written Test without any prior notice.

**Registrar**
**Dr. P.D.K.V.,Akola**